रे.दि.मु.क्र. १६७/१९८८

निशाणी क्र. १५० खालील आदेश :–

वस्तुस्थिती रेकॉर्डवर आणणेकरीता कमिशनरच्या नियुक्तीकरीता वादीने सदरचा अर्ज केला आहे.

२) वादीने दावा सुरु असताना प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त ताकीद अर्ज (नि.१४४) दाखल केला. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने दावा मिळत क.ग.नं. १२४२ मध्ये नवीने घराचे बांधकाम करणेच्या दृष्टीने खड्डे खोदण्यास सुरुवात केलेली आहे. वादीने हरकत घेतली असता त्याने ती जुमानलेली नाही. याउलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे क.ग.नं.१२४२ मध्ये त्याचे गोठा व परडे पूर्वीपासुन होते व आहे. गोठयाचे लाकडी खांब कुजलेले असुन मातीचे बांधकाम ढासळलेले आहे. त्यामुळे प्रतिवादीने सदर गोठयाची दुरुस्ती करणेकरीता सामान गोळा केलेले आहे. परंतु वादीने सदरची बाब मुद्दाम लपवलेली आहे. प्रतिवादीने त्याच्या कथनाचे समर्थनार्थ गोठयाचे फोटो दाव्याचे कामी हजर केले आहेत. वादीचे वकीलांनी असे कथन केले की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीचा गुरांचा गोठा असलेची खोटी रचना त्याने केली आहे. प्रतिवादीने नवीने घराचे बांधकाम करणेच्या दृष्टीने खड्डे खोदण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये पूर्वी गुरांचा गोठा होता का व इतर परिस्थिती रेकॉर्डवर आणणेकरीता कमिशनरची नियुक्ती होणे आवश्यक आहे. प्रतिवादीच्या वकीलांच्या कथनाप्रामणे वादीने सदरचा अर्ज पुरावा गोळा करणेच्या दृष्टीने केला आहे. दावा मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यांमध्ये देखील त्यामध्ये गोठा असल्याचे नमूद केले आहे. वादींनी या सर्व बाबी नाकारल्या आहेत. सदरचा दावा १९८८ सालचा आहे व वादीने आता यामध्ये प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त ताकीद देण्याचा अर्ज केला आहे. दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन करता माझ्या मते कमिशनरची नियुक्ती होवून वस्तुस्थिती रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे.

म्हणुनच वादी व प्रतिवादीचे कथन लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१) श्री. महेश बी. भोसले वकीलांची कोर्ट कमिशनर म्हणुन नियुकती करणेत येते.

२) कमिशनरने दावा मिळकत गट नं. १२४२ वर जावून गट नं. १२४२ मध्ये गुरांचा जुना गोठा आहे का व तसेच प्रतिवादीने त्यामध्ये गोठया व्यतिरिक्त नवीन बांधकाम करणेच्या उद्देशाने खोदकाम सुरु केले आहे का व असल्यास सदरच्या बांधकामाच्या वस्तुस्थितीचे मोजमापासह वादी व प्रतिवादीसमक्ष अवलोकन करुन त्याचा अहवाल पुढील तारखेपर्यंत सादर करावा.

३) वादीने कमिशनर फी म्हणुन रु.७००/– कोर्टात जमा करावी व तसेच दावा मिळकतीच्या ७/१२ चा उतारा, कमिशनर अर्ज व त्यावरील आदेशाची प्रत कमिशनरला द्यावी.

४) येणेप्रमाणे रिट देणेत यावे.

कोरेगांव
दिनांक : ०९/०२/२००९

(यो.म.तिवारी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कोरेगांव